



# रत्नापूर येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम साजरा..

खोज मास्टर
४
१७ जानेवारी २०२५

**मेहकर:-(विशेष प्रतिनिधी)**
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय रत्नापूर तालुका मेहकर येथे १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा विशेष उपक्रम वाचनालयामार्फत राबविण्यात येत आहे या उपक्रमात युवा पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृतीला चालना देणे या प्रमुख उद्देशाने ग्रंथ प्रदर्शनी,ग्रंथ परीक्षण,सामायिक वाचन अशा विविध कार्यक्रमांमधून विद्यार्थी व ग्रंथालय वाचकांना वाचण्यासाठी प्रोत्साहन देणे हे या मागील प्रमुख कारण असल्याचे वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पोपळघट यांनी सांगितले या उपक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष अरुण पोपळघट, उपसरपंच शेषनारायण पवार,तंटामुक्ती अध्यक्ष सागर काठोळे, सचिव सुधाकर काठोळे नितीन चवाळे,ग्रंथपाल अजय पोपळघट आदींची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालयाचे अध्यक्ष अरुण पोपळघट यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भास्कर काठोळे यांनी केले.



## चांदीचे दागिने आणि दानपेटीतील ३ लाख ४२ हजार चा ऐवज लंपास



**बुलढाणाः ( विशेष प्रतिनिधी )** बुलढाणा व अकोला जिल्ह्याच्या सीमेवरील सोनाळा पोलीस स्टेशन हद्दीतील सुप्रसिद्ध वारी भैरव गड वारी गावातील प्रसिद्ध हनुमान मंदिरात काल रात्री मोठी चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहेअज्ञात चोरट्यांनी मंदिरातील चांदीचे दागिने आणि दानपेटीतील पैसे मिळून सुमारे ३ लाख ४२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहेही घटना दिनांक १४ जा- नेवारीच्या रात्री १०:३० ते १५ जानेवारीच्या सकाळी ५:०० च्या दरम्यान घडली. हनुमान मंदिर संस्थानचे सचिव प्रमोद विखे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंदिराचे मुख्य लोखंडी गेट आणि दोन लाकडी दरवाजांचे लॉक तोडून चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केलाहनुमान आणि गणपतीच्या मूर्तीवरील चांदीचे हार, मुकुट, कंबरपट्टा, हातकडे, पायातील पैजण, छतरी आणि इतर दागिने गायब आढळले. याशिवाय, मंदिरातील लोखंडी दानपेटीही चोरीला गेली होती. ही दानपेटी मंदिराजवळील बान नदीच्या पुलाजवळ फ्फोडलेल्या अवस्थेत आढळून आली. त्यामधील अंदाजे ७० हजार रुपये चोरट्यांनी लंपास केले आहेत. मंदिर संस्थानच्या सचिवांनी पोलिसांना याची तक्रार दिली असून, चोरट्यांनी एकूण ३ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याचे सांगितले आहे. घटनेची माहिती मिळताच सोनाळा पोलिसांनी घटनास्थळी घाव घेतली आणि तपास सुरू केला असून पोलीस अधिकारी ॲडिशनल एस पी बोरात साहेब यांनी स्वतः मंदिरात पाहणी केली तसेच बुलढाणा येथील डॉग स्कॉट स्वान पथक यांनी मंदिरातील हनुमान मूर्ती जवळील अग्यात चोरट्याचे वरील सर्व घटनास्थळीचे पाचरण करून तपास सुरू केला आहे स्थानिकांच्या मते, मंदिर परिसरात रात्री अपर्याप्त सुरक्षा असल्यामुळे ही घटना घडली असावी. सोन- ाळा पोलिस ठाण्याचे पथक सध्या चोरट्यांचा शोध घेत आहे. या प्रकरणात मंदिर प्रशासनाची जबाबदारी आणि सुरक्षा व्यवस्थे- वरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही घटना धार्मिक स्थळांवरील सुरक्षेची स्थिती संस्थेच्या गस्तीदरम्यान होणाऱ्या दुर्लक्षाला अधोरेखित करते. सत्यशोधक न्यूज चॅनल या घटनेवर बारीक नजर ठेवत आहे तसेच वृत्तसंकलन साठी गेलेल्या पत्रकार शेख कदीर भाई यांचे आयडी दैनिक सेवाशक्ती टाइम्स चीं त्या ठिकाणी कुठेतरी पडले असल्याचे संध्याकाळी समजले परंतु सोनाळा पोलीस स्टेशन मधून मिळालेल्या माहितीनुसार आयडी सोनाळा पोलीस कडे आहे

## अकोला महानगरपालिकेत आतापर्यंत टॅक्स वसुलीमध्ये विविध कंपनीने केले घोळ ?



**अकोला:- ( विशेष प्रतिनिधी )** अकोला महानगरपालिकेत सन. २००६ मध्ये माजी आमदार गोपीकिशन चाजोरीया यांनी स्थापत्य कंपणी विरोधात विधानसमेत प्रश्न उपस्तित केला असता तत्कालीन उप जिल्हाधिकारी ठाकरे यांनी स्थापत्य प्रा. ली. अमरावती प्रो. प्रा. अमोल डोईफ्फोडे यांना काळ्या यादीत टाकले होते. सन. २०१६ साली सत्ताधारी पक्षानी अकोला शहराची कर आकारणी करीता काळ्या यादीतील (ब्लॅक लिस्ट) असलेल्या स्थापत्य कंपणीशी करार करण्यात आला होता . या कंपणीने मागणी वाढवण्यासाठी कमालीची करवाढ ही अकोले कराच्या माथी मारली महाराष्ट्र राज्यात कुठे नाही इतका मोठा भरमसाठ कर अकोलेकरांच्या माथी लावण्यात आला. याविषयी काग्रेस चे नगरसेवक जिशान हुसेन यांनी या करवाढी विरोधात जनहित याचीका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडापिठात दाखल केली.सन. २०२१ मध्ये यावर निकाल सुध्दा अकोल्यातील सामान्य नागरिकाकडून लागला होता. पुढे सन. २०२२ ची निवडणुकीत जनता विरोधात जाईल म्हणून सत्ताधारी पक्षाने या निर्णया विर- ोधात प्रशासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात या निकालाविरोधात निर्णयाच्या विरोधात अपील दाखल करण्यात आली केली असल्याचे बोलले जात आहे प्राप्त माहिति अनुसार सदर कंपणीला कर आकारणी सोबत सन २०१७- १८ची वसुली करण्यासाठी नेमणूक केली होती मात्र नेमणूक ही नावापुरती होतो करवसुली मात्र महानगरपालिका कर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली होती. पहिल्या वीं एकाएक राज्यात नवे इतका भरमसाठ करवाढ झाल्याने नागरिकांनी कर भरण्यास विरोध दर्शवल्यामुळे करवसुली ५०% झाली असल्यामुळे तत्कालीन आयुक्त अजय लहाने यांनी कमी वसुलीचा ठपका स्थापत्य कंपणीवर न ठेवता कंपणीवर कार्यवाही न करता करवसुली विभागाच्या कर्मचान्यांचे दोन महिण्याचे वेतन रोखले होते. हे विशेष मात्र कंपणीवर कार्यवाही करण्याऐवजी कर्मचाऱ्यांचे वेतन रोखल्याची चुक आयताच्या लक्षात आल्याने लगेच दुस-याच दिवशी करवसुली कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आले.

## बिर्ला रोडवरील धार्मिक स्थळाच्या अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई



**अकोला:- ( विशेष प्रतिनिधी )** अकोला दि. १६ जानेवारी २०२४ जठारपेठ भागातील न्यु तापडीया नगर, रेल्वे उड्डाणपुला जवळील बिर्ला राम मंदीर कडे जाणा- या रस्त्यावर अनेक वर्षापासून कुलकर्णी नावाच्या व्यक्ति कडून अकोला आईल इंडस्ट्रीजच्या आणि रस्त्याच्या जागेवर घर व धार्मिक स्थळाचे अतिक्रमण करण्यात आले होते यामुळे वाहतुकीस ही अडचण निर्माण होत होती तसेच मनपा प्रशासनाव्दारा सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे कामही करावयाचे आहे. मुंबई मा. उच्च न्यायालयच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार तसेच मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी सदर ठिकाणच्या अतिक्रमणापैकी घराचे आणि धार्मिक स्थळाच्या आवार भिंती आणि परिसरातील अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली होती. तसेच उरलेल्या धार्मिक स्थळाच्या अतिक्रमणावर दि. १६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि मनपा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. या कारावईत उपविभागीय अधिकारी शरद जावळे, पुर्व झोन कार्यालयाचे सहा. आयुक्त विजय पारतवार, रामदास पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज बहरे, तहसीलदार अकोला सुरेश कव्हाळे, उप अभियंता भुमि अभिलेख कार्यालय कुणाल राजपुत, सहा. नगर रचनाकार संदीप गावंडे, विधी अधिकारी शाम ठाकुर, अतिक्रमण विभागाचे सहा. अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, कनिष्ठ अभियंता नरेश कोपेकर यांचेसह मनपा अतिक्रमण विभागातील आणि अभिकर्ताचे कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## सिंदखेड राजा मतदासंघाचा चेहरामोहरा बदलणार : आ. कायंदे



**दुसरबीड:-( विशेष प्रतिनिधी )** जनतेच्या समस्यांची जाणीव असल्यामुळे जनतेने आमदार म्हणून निवडून दिले आहे. गेल्या अनेक वर्षापासून जनतेला आमदार हा जनतेतील मिळाला नसल्याने मतदारसंघातील विकासाची कामे झाली नाहीत. गेल्या ३० वर्षात काहीच काम झाले नाही. माझ्या वयाएवढाच बॅकलॉग या सिंदखेडराजा मतदारसंघात दिसतोय. परंतु, माझ्याकडून आता जनतेच्या अपेक्षा असल्याने यापुढे मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलणार असल्याचे प्रतिपादन आमदार मनोज कायंदे यांनी केले. स्थानिक बाजार गल्लीत सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांचा भव्य जाहीर नागरी सत्कार १० जानेव- ारी रोजी पार पडला, यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी तर प्रमुख उपस्थितीत माजी आमदार तोताराम कायंदे, माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे, विष्णू मेहेत्रे, माजी उपसभापती श्याम जाधव, संतोष खांडेभराड, भाजप जिल्हाउपाध्यक्ष प्रभाकर ताठे, माजी जिल्हा सदस्य भगवान मुंडे, भगवान आघाव, शिवाजी खरात, श्रीकृष्ण तौर, सिद्दिकसेठ मिरचीवाले, गणेश राजेजाधव, माजी सरपंच वैजनाथ कुडे, आप्पासाहेब बुधवत, प्रकाश सांगळे, बाळासाहेब देशमुख, आर.एम.गवई, सिद्धार्थ जाधव, जऊळकाचे सरपंच गजानन मुंढे, प्रा. दिलीप चव्हाण हे होते. मतदारसंघातील जिजामाता सहकारी कारखाना, साखरखेर्डा येथील सूतगिरणी हे तालुक्यातील महत्वाचे प्रश्न आहे. कारखान्यासंदर्भात पुढच्या आठवड्यात उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात बैठक लागली आहे. त्यात कारखाना सुरू करण्यासाठी काय तो निर्णय घेता येईल. परंतु, कारखाना प्रशासनाने स्थानिक रोजगारांना रोजगार दिला पाहीजे, यासाठीच माझा आग्रह वजा कारखाना प्रशासनाला विनंती आहे, असे सांगून समस्या असल्यास जनतेने थेट माझ्याशी संपर्क करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक इरफ्फानअली शेख यांनी केले. यावेळी प्रभाकर ताठे, जुनेद अली, कचरूजी बारस्कर, डॉ. शिवाजी खरात यांची समायोजित भाषणे झाली. संचालन नय्युम शेख तर आभार मुजिब आलम यांनी मानले. यावेळी माजी सरपंच दादामिया कुरेशी, कारभारी काळे, अबरार शेख वाहेद, शेख आबेद शेख खालेद, शेषराव नागरे, टि.टि. साबळे, सहारा मित्रमंडळाचे शेख जाकिर, रहेमान शेख, सिनेकलाकार नासेर शेख, सागर सांगळे, मच्छिद्र जेठे, सुभेदार साजिद शेख, मुदस्सर अली, तनवीर शेख, तलत अली, गणेश घुगे, सोहिल अली, सुधाकर मुंढे, विकास घुगे, दिलशाद शेख, योगेश भारस्कर यांच्या सह पंचकोशीतील असंख्य महायुतीच्या पदाधिकाऱ्यांसह असंख्य नागरिक उपस्थित होते.

## नियमित निधी इतर योजनेकडे वळविल्यामुळे स्वयंपाकी मदतनिसांवर उपासमारीची वेळ: कॉम्रेड पंजाबराव गायकवाड






**बुलडाणा ( विशेष प्रतिनिधी )** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत जिल्ह्यात ४ हजार तीनशे स्वयंपाकी मदतनीस १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शाळे मध्ये मध्यान्ह भोजन शिजवण्याचे काम अत्यंत अल्पशा २५०० रुपये मानधनावर म्हणजे ८३ रुपये रोजावर गेल्या कित्येक वर्षापासून करतात. परंतु गेल्या ३ महिन्यापासून त्यांचे हे मिळणारे तूटपुंजे मानधन मिळा- लेले नाही. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे विचारणा केली असता राज्य स्तरावरून निधी प्राप्त न झाल्यामुळे मानधनांस विलंब होत आहे. अशा प्रकारचे उत्तर दिले जात आहे. निधी अभावी जर ह्या गोरगरीब स्वयंपाकी मदतनीस यांचे मानधन होत नसेल व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत असेल तर ही गोष्ट आर्थिक दृष्ट्या प्रगत आणि पुर- ोगामी म्हणून घेणार्या महाराष्ट्रासाठी निश्चितच अभिमानास्पद नाही. या योजने- वरचा नियमित निधी सरकारने इतर योजनेकडे तर वळविला नाही ना? असा आरोप संघटनेचे जिल्हा अध्यक्ष कॉ. पंजाबराव गायकवाड यांनी आज १६ जा- नेवारीच्या आंदोलनात बोलताना सरकारवर केला. विधानसभेची निवडणूक आचारसंहिता लागण्यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वयंपाकी मदतनीसांचे १ हजार रुपये मानधन वाढवण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्याचा शासन निर्णय अद्याप काढलेला नाही. केंद्र सरकारने तर २०१८पासून एक रूपयांची सुद्धा वाढ केली नाही. दैनंदिन आहार शिजविण्याचे काम करीत असताना इंधना पासून तर भाजीपाला आणि धान्याच्या दर्जा पर्यंत अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत आहे. शिवाय शालेय समितीच्या मनमानी कारभारामुळे अनेक कामगारांना विना तक्रार कुठलीही चौकशी न करता कामावरून कमी केल्या जात आहे. या अन्यायाच्या विरोधात हे आंदोलन आज लाल बावटा शालेय पोषण आहार कामगार संघटनेच्या वतीने आम्ही जिल्हा परिषद कार्यालयासमोर करीत आहोत. या आंदोलनाची सरकारने तातडीने दाखल घेऊन नियमित मानधन तर दिलेच पाहिजेत शिवाय जाहीर केल्या प्रमाणे १ हजार रुपयांची वाढ त्वरित केली पाहिजे. असे मत संघटनेच्या सचिव शोभाताई काळे, ज्ञानेश्वर वाघमारे यांनी बोलताना यावेळी व्यक्त केले. वा आंदोलनाच्या मागण्यांचे निवेदन मा. मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या मार्फ्फत महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री यांना पाठवण्यात आले. वावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पंजाबराव गायकवाड, सचिव शोभा काळे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर वाघमारे, राजीव गिरी, सुनिल गजानन शेळके,, सविता राजपूत उषा डुकरे, अनंता धर्माळ, ज्ञानेश्वर कानपूरे, रेखा जाधव, मालता खरात, बेबी मोरे, अशोक राठोड, आकाश साळवे, प्रतिभा देशमुख, बाबुराव जावळे, ज्योती आराख, उर्मिला राठोड, इत्यादी सह जिल्ह्यातील शेकडो शालेय पोषण आहार कामगार या आंदोलनात सहभागी होते.

## समृद्धीवर काल 'यमदूत' आडवा आला होता पण..!



**बुलढाणा ( विशेष प्रतिनिधी )** स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग होणाऱ्या अपघातांमूळे कुप्रसिध्द झालाय. या समृद्धी महामार्गावर अनेक वेळा 'यमदूत' आडवा येत असल्याने भीषण अपघात होऊन अनेकांना प्राण गमवावे लागत आहेत. तर अपंगत्व येऊन शेकडो जण खाटेवर निपचित पडून आहेत.१६ जानेवारी रोजी चॅनल नंबर ३२६.२ नागपूर कॅरिडोर वर कार क्रमांक चक १२-ऋ्य-५९०१ चे चालक संकरित श्रीनिवास रेड्डी वय २३ वर्ष रा अंधेरी, मुंबई हे मुंबईवरून लग्न समारंभासाठी नागपूरच्या दिशेने जात असताना सदर ठिकाणी कुत्रा आडवा आल्याने चालकाचे कार वरील नियंत्रण सुटल्याने कार अक्षरशा मिडीयम लेन कडून साईड बॅरिअरपर्यंत दोन्ही साईडला धडकली. यामध्ये सर्व प्रवासी यांनी सीट बेल्ट लावेल असल्यामुळे समोरील एअर बॅग उघडल्यामुळे प्राणहानी टळली परंतु कारचे अक्षरशः समोरील एक्सेल सहित दोन्ही चाके तुटून बाजूला झाली व पाठीमागून सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दैव बलवत्तर म्हणून यामध्ये श्लोक कोळमकर वय २४ वर्ष व पुष्पेन्द्र गुप्ता व २७ वर्ष हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना ताबडतोब समृद्धी महामार्गावरील रुग्णवाहीकेचे डॉक्टर शरद शेळके व चालक दिगंबर शिंदे यांनी प्रथमोपचार करून सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालय येथे भरती केले. व सोबत असलेले मोनाली टोपाल व २८ वर्ष व चालक हे किरकोळ जखमी झाले. तसेच कारचे समृद्धी महामार्गावर इंजिनचे दोन तुकडे होऊन चाके बाजूला तुटून पडल्याने काही काळ वाहतूक हळू प्रमाणात सुरू ठेवून महामार्ग पोलीसचे पीएसआय जितेंद्र राऊत पोलीस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे, विजय आंधळे व महाराष्ट्र सुरक्षा बलचे गायकवाड व पवन सुरुशे व स्टॉप यांनी टठत टीम चे श्रीकृष्ण बच्छीरे, आदित्य गोप- ाळे, दिगंबर इंगोले, नितीन भिसेन यांच्या मदतीने अपघातग्रस्त कार महामार्गाच्या साईडला घेऊन टोईंग करून सुरक्षित ठिकाणी उभे केले. व वाहतूक सुरळीत करण्यात आली.विशेष म्हणजे सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दिनांक एक जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मा. अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक श्री सुरेश मेकला साहेब यांच्या आदेशाने व यशवंत सोळंके पोलीस अधीक्षक महामार्ग प्रादेशिक विभाग, नागपूर. यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान राबवून महामार्गावर होणाऱ्या अपघाताबद्दल पोस्टर, भिंती पत्रके वाटप करून व इतर जनजागृती कार्यक्रम करण्यात येत आहे. तरी सर्व वाहनधारकांनी नियमाचे पालन करूनच वाहन चालवावे, असे आवाहन महामार्ग पोलीस चे प्रभारी अधिकारी श्री संदीप इंगळे हे करीत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक रमेश भीमराव चव्हाण यांनी वैभव ऑफसेट ॲन्ड प्रिंटर्स जिजामाता कन्या शाळा जवळ मेहकर येथून प्रकाशित केले आहे सर्व वाद मेहकर न्यायालया अंतर्गत, वरील छापलेल्या सर्व मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही मो.नं. ९६५७४५१५९६.